पुणे महानगरपालिका
वृक्ष प्राधिकरण कार्यालय
छत्रपती संभाजीराजे उद्यान,जंगली महाराज रस्ता,
बालगंधर्व रंगमंदिराशेजारी,शिवाजीनगर, पुणे ४११०
दूरध्वनी:-०२०-२५५३२५१४/२५५३८५५३
जावक क्र. वृप्राजा/ 9L89
दिनांक ३१/१०/२०२५

प्रति,
मे.न्याती शुभम निर्माण डेव्हलपर्स एल.एल.पी.
तर्फे भागीदार श्री.प्रणव नितीन न्याती,
न्याती हाउस, येरवडा, पुणे

यांस......

विषय:-वृक्षारोपणास जागा उपलब्ध करून देणेबाबत.

संदर्भ:-१) आपले पत्र आवक क्र.३३२२ दि.२३/९/२०२५
२) कर्नल श्री.संजय यादव,स्टेशन हेडक्वार्टर पत्र क्र.२०११/PMC/Q2(Rd) date 09 Aug 2025

संदर्भांकित पत्रान्वये सिटीएस नं.३०२४/१२,द पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, भांबुर्डा,शिवाजीनगर,पुणे येथील प्रकल्पास पर्यावरण ना हरकत प्रमाणपत्र (Environment Clearance) १०३५ वृक्ष लागवड करावयची आहे.

सद्यस्थितीत जागेवर बांधकाम पूर्व ना हरकत दाखला जावक क्र.३७२७ दिनांक १२/०८/२०२४ नुसार एकूण २२८ वृक्ष अस्तित्वात आहेत. नवीन १०३५ वृक्षांची लागवड करणेसाठी जागा उपलब्ध करून देण्याविषयी आपण संदर्भांकित पत्रान्वये मागणी केली आहे.

संरक्षण दलाच्या मिळकती वृक्षारोपण करणेसाठी पुणे महानगरपालिकेस उपलब्ध करून दिलेले असल्याबाबत संदर्भांकित पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

त्यानुसार आपणास (१) CAFVD स्टेडीयम बाजूने, (२) सिंचननगर रोड रेंज हिल्स कॉर्नर पर्यत १ व २ सर्कल,(३)स्टेशन हेड क्वार्टरच्या पूर्व सल्ल्याने कत्तलखान्याजवळ,खडकी,(४) POL डेपो खडकी रस्त्याच्या दुतर्फा,(५) पार्क रोड रेंज हिल्स ते सावित्रीबाई फुले विद्यापीठ गेट येथे वृक्षरोपणास खालील अटीवर जागा उपलब्ध करून देण्यात येत आहे.(सोबत संदर्भांकित क्र.२ च्या पत्राची प्रत जोडली आहे.)

१) सदर जागेत झाडांना पाणी देणे,झाडांना आधार देणे व सदर जागेतील गवत काढणे इत्यादी कामे आपल्याकडून करणे आवश्यक आहे.
२) सदर उपलब्ध करून दिलेल्या जागेवर कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क वा अधिकार आपणांकडून दाखवता/सांगता येणार नाही.
३) सदर जागेत केलेली वृक्ष लागवड हि उद्यान विभागाची मालकीची राहील.तसेच सदर वृक्षांचे संवर्धन करण्याचा कालावधी ७ वर्षापर्यंत राहील.

४) सदर जागेत कोणत्याही प्रकारचे जाहिरातीचे फलक लावू नये.

५) सदर ठिकाणी वृक्ष लागवड करीत असताना लागणारी माती व त्यासाठी लागणारी यंत्रणे आपल्या स्वखर्चाने उपलब्ध करण्यात यावी.

६) सदरची वृक्ष लागवड हि संबधित हॉ.मिस्त्री यांच्या नियंत्रणाखाली करण्यात यावी. तसेच करण्यात आलेली वृक्ष लागवडीचा अहवाल दर सहा महिन्याने संबधित क्षेत्रिय कार्यालयाकडे सादर करण्यात यावा.

७) सदरच्या पत्राच्या जावक दिनांकापासून तीन महिन्याच्या आत वृक्ष लागवड करणे बंधनकारक राहील.

31/10

(डॉ.अशोक दि.घोरपडे)
सह महापालिका आयुक्त
तथा सदस्य सचिव, वृक्ष प्राधिकरण
पुणे महानगरपालिका